# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०–२५६०१३५३
ई–मेल
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

संदर्भ क्र.:आयक्यूएसी/४८

दि :– १८ एप्रिल, २०१८

प्रति,
मा.अध्यक्ष/सचिव,
मा.प्राचार्य/संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

विषय – नॅककडून A किंवा A⁺ किंवा A⁺⁺ दर्जा प्राप्त महविद्यालय/परिसंस्थांच्या सहविचार सभेबाबत...

संदर्भ – आयक्यूएसी/३१, दिनांक – १० एप्रिल, २०१८ रोजीचे परिपत्रक.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रानुसार, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेकडून A किंवा A⁺ किंवा A⁺⁺ दर्जा प्राप्त झालेला आहे, अशा महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे मा. संस्थाचालक व मा.प्राचार्य/संचालक यांची शुक्रवार दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी सकाळी ११.३० वा. विद्यापीठातील व्यवस्थापनशास्त्र विभाग (PUMBA) येथे सहविचार सभा आयोजित करण्यात आल्याचे कळविण्यात आलेले आहे.

पुढे असेही कळविण्यांत येते की, ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना मागील Cycle मध्ये राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेकडून A किंवा A⁺ किंवा A⁺⁺ दर्जा प्राप्त झालेला होता परंतू त्याची सध्या वैधता संपलेली आहे व पुढील मूल्यांकन Cycle ची कार्यवाही चालू आहे. अशा महाविद्यालये/परिसंस्थांच्या मा. संस्थाचालक व मा.प्राचार्य/संचालक यांनीही सदर सभेस कृपया उपस्थित रहावे.

कळावे,

आपला,

डॉ.प्रफुल्ल पवार,
संचालक
(अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष)